# बँक ऑफ बरोडा स्थानीय लोकाधिकार समिती

संलग्न : स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ
अध्यक्ष : मा. श्री. गजानन किर्तीकर (खासदार)
कार्याध्यक्ष : मा. श्री. आनंदराव अडसूळ (खासदार)
जनरल सेक्रेटरी : मा. श्री. अनिल देसाई (शिवसेना सचिव व खासदार)
(संसदीय समिती सदस्य - सार्वजनिक उद्योग)

कार्यालय : १०/१२, बँक ऑफ बरोडा बिल्डींग ( MMO ), पोटमाळा, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : ०२२ - ४०४६८०११ ई-मेल : bobksena@yahoo.com


पत्र /२६ /२०२० दि. २६ जुन २०२०

प्रति,

**विषय - आपल्या वर्तमानपत्रा मध्ये खालील बातमी प्रकाशित करण्याबद्दल**

**महोदय**,

दि. २६ जुन रोजी बँक ऑफ बरोडा स्थानीय लोकाधिकार समिती कडून कोल्हापूर मध्ये प्रथमच शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.
ही बातमी आपल्या वर्तमानपत्रा मध्ये प्रकाशित करण्यात यावी ही विनंती. सोबत बातमीचा मजकूर आणि कार्यक्रमाचे छायाचित्र देत आहोत.

**मजकूर -**

कोल्हापुर (दि२६): छत्रपति राजर्षि शाहू महाराज यांच्या जयंतिनिमित्त बैंक ऑफ बरोदा स्थानीय लोकाधिकार समिति यांच्या वतीने राजर्षि शाहू महाराज यांस आदरांजलि वाहन्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बैंक ऑफ बरोदा कोल्हापुर विभागाचे उप महाप्रबंधक श्री विवेक चौधरी उपस्थित होते. श्री.विवेक चौधरी यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री.विवेक चौधरी यांनी समाजातील दुर्लक्षित आणि मागसलेल्या घटकांना सक्षम बनवून त्यांना समाज्याच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाहू महाराजांनी केलेल्या कार्याची आठवन करुण देत आजच्या परिस्तिथितही शाहू महाराजांचे विचार तंतोतंत लागू पडत असल्याचे म्हटले. ते पुढे म्हणाले "बैंक ऑफ बरोदा छत्रपति शाहू महाराजांच्या कार्यस सलाम करते तसेच त्यांचे विचार अंगीकृत करण्याचा निश्चय आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्ही करित आहोत".तसेच त्यांनी बँक ऑफ बरोडा मध्ये प्रथमच शाहू जयंतीचा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल बँक ऑफ बरोडा स्थानीय लोकाधिकार समिती आणि ऑल इंडिया बँक ऑफ बरोडा कर्मचारी सेना यूनियनचे कौतुक केले.
सदर कार्याक्रमास बैंक ऑफ बरोडा शिवाजी चौक शाखेचे शाखाप्रमुख श्री प्रखर कुमार, शाहपुरी शाखेचे शाखाप्रमुख श्री सचिन देशमुख तसेच ऑल इंडिया बैंक ऑफ बरोदा कर्मचारी सेनेचे पदाधिकारी श्री विशाल नलावडे, श्री भरत

पाटिल, श्री पराग कुलकर्णी, श्री अमोल पाटिल, श्री रोहन पाटिल, श्री आशीष रामटेके आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रशांत तावरे यांनी केले.

<u>**कार्यक्रमाचे छायाचित्र**</u> **:**




( बँक ऑफ बरोडा स्थानीय लोकाधिकार समितीच्या वतीने आयोजित शाहू जयंतीच्या कार्यक्रमाला उपस्थित बँक ऑफ बरोडा, कोल्हापूर विभागाचे उप महाप्रबंधक श्री.विवेक चौधरी. सोबत कर्मचारी सेना यूनियनचे विशाल नलवडे, भरत पाटील आणि इतर पदाधिकारी )

ही बातमी आपल्या वर्तमानपत्रा मध्ये प्रकाशित करण्यात यावी ही विनंती.

सादर आभार,

**विनोद निकम**
**(अध्यक्ष, बँक ऑफ बरोडा स्थानीय लोकाधिकार समिती)**